महानगर दंडाधिकारी यांचे न्यायालयात
६६ वे न्यायालय, अंधेरी, मुंबई

नोटीस क्र :— ८४४/एन/२०२१ गुन्हा नोंद क्र :— ४५६/२०२०.
पोलीस ठाणे पवई

लोचन रूपेश सोनावणे ... अर्जदार.

विरूध्द्

महाराष्ट्र सरकार,
द्वारा — वरिष्ठ पोलीस निरिक्षक,
(पवई पोलीस ठाणे) ... गैरअर्जदार.

निशाणी क्र.—१ खालील आदेश

१. प्रस्तुतचा अर्ज पवई पोलीस ठाणे गुन्हा क. ४५६/२०२० कलम ४९८(अ), ४०६, ५०४, ३२३, ३४ भा.द.वि. संहितामध्ये सोन्याचे दागिने (१) सोन्याचे नेकलेस (२) सोन्याचे कानातले (३) सोन्याची नथ (४) दोन जोड चांदीचे पैंजण (४) दोन जोड चांदीचे जोडवी (५) सोन्याचे मंगळसुत्र व (६) साखरपुडयामध्ये घालण्यात आलेले इतर दागिने एकुण किंमत २,६२,०००/— व नगद रूपये ४,३८,०००/— एकुण किंमत रूपये ७,००,०००/— (रू.सात लाख फक्त) मालमत्तेचा (स्त्रीधन) अंतरिम ताबा मिळवण्यासाठी दाखल केलेला आहे. अर्जदाराकडे जप्त मुद्देमालाची पावती नाही. अशी कथने करून अर्ज मंजूर होण्याची विनंती अर्जदाराने केलेली आहे. अन्वेषन अधिकारी व शासकीय अभियोक्ता यांचे म्हणणे वाचले. अर्ज मंजूर होण्यास त्यांचा आक्षेप नाही. उभय बाजूंचा युक्तिवाद ऐकला.

२. अर्जाच्या पृष्ठर्थ अर्जदाराने स्वत:चे शपथेवर प्रतिज्ञापत्र (निशाणी क.२) दाखल केलेले आहे. अर्जदाराच्या कथनावरून अर्जदार जप्त मालमत्तेचे (सोन्याच्या दांगिन्यांचे) कायदेशीर मालक दिसत आहे. आजपर्यंत इतर कोणीही जप्त मुदद्मालाबाबत कोणत्याही प्रकारे दावा केलेला नाही. त्यामुळे अर्ज अटी व शर्तीवर मंजुर होण्यास पात्र आहे. त्यामुळे मी पुढील प्रमाणे आदेश पारित करीत आहे.

आदेश

१ अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२ संबंधित तपासी अंमलदार यांना आदेशीत करण्यात येते की, पवई पोलीस ठाणे गुन्हा क. ४५६/२०२० कलम ४९८(अ), ४०६, ५०४,

३२३, ३४ भा.द.वि. संहितामध्ये (१) सोन्याचे नेकलेस (२) सोन्याचे कानातले (३) सोन्याची नथ  (४) दोन जोड चांदीचे पैंजण (४) दोन जोड चांदीचे जोडवी (५) सोन्याचे मंगळसुत्र व (६) साखरपुडयामध्ये द ाालण्यात आलेले इतर दागिने एकुण किंमत २,६२,०००/— व नगद रूपये ४,३८,०००/—  एकुण किंमत रूपये ७,००,०००/— (रू.सात लाख फकत) मालमत्तेचा अंतरिम ताबा अर्जदारास तिने रू. ७,००,०००/— (रू. सात लाख फक्त) चा शर्तीपूर्ती बंधपत्र दिल्यावर खालील अटींवर देण्यात यावा.

अ  अर्जदाराने जप्त मुदद्माल (रोख रक्कम वगळता)  न्यायालयाच्या पूर्व परवानंगी शिवाय हस्तांतरित करू नये अथवा त्यामध्ये बदल करू नये.

ब  तपासी अंमलदार यांनी जप्त मुदद्मालाचे छायाचित्रे सर्व बाजूंनी भविष्यातील त्याच्या ओळखीसाठी काढावेत व त्याबाबतचा दोन पंचासमक्ष सविस्तर पंचनामा तयार करावा.

३  छायाचित्रे, पंचनामा व शर्तीपूती बंधपत्र अन्वेषन अधिका—याने दोषारोपपत्रासोबत अथवा अंतिम अहवालासोबत दाखल करावेत.

Sd/-

दि. ०४/०१/२०२२.

(विजय चिं. गवई)
महानगर दंडाधिकारी,
६६वे न्यायालय, अंधेरी, मुंबई.